Vol II Issue IX

ISSN No : 2230-7850

Monthly Multidiciplinary
Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume 2, Issue. 9, Oct 2012
**ISSN:-2230-7850**

Available on all social networks
citeulike

ORIGINAL ARTICLE

# भारतातील असंघटित कामगारांच्या सामाजिक व आर्थिक सुरक्षेसाठी शासकीय पातळीवरील प्रयत्न

**Vasant Gangadhar Bhandurge**

Department of Economics ,University of Pune

***सारांश :***

भारतात असंघटीत क्षेत्रातील कामगारांची संख्या एकूण कामगारांच्या ९४ % एवढया प्रचंड प्रमाणात आहे, तर संघटीत क्षेत्रातील कामगारांची संख्या एकूण कामगारांच्या फक्त ६ % आहे. असंघटीत कामगार हे शेतमजूर, बांधकाम क्षेत्रातील कामगार, विडया तयार करणे, अगरबत्ती तयार करणे, पापड तयार करणे, कपडे शिवणे तसेच कलाकुसरी करणे, वाहतूक क्षेत्रातील कामगार , व्यापार व सेवा क्षेत्रातील कामगार इत्यादि व्यवसायात आहेत.

प्रस्तावना :

भारतात असंघटीत क्षेत्रातील कामगारांची संख्या एकूण कामगारांच्या ९४ % एवढया प्रचंड प्रमाणात आहे, तर संघटीत क्षेत्रातील कामगारांची संख्या एकूण कामगारांच्या फक्त ६ % आहे. असंघटीत कामगार हे शेतमजूर, बांधकाम क्षेत्रातील कामगार, विडया तयार करणे, अगरबत्ती तयार करणे, पापड तयार करणे, कपडे शिवणे तसेच कलाकुसरी करणे, वाहतूक क्षेत्रातील कामगार , व्यापार व सेवा क्षेत्रातील कामगार इत्यादि व्यवसायात आहेत. संघटीत क्षेत्रातील कामगार आपल्या संघटनेच्या बळावर आपल्या अनेक मागण्या मान्य करून घेतात तसेच संघटनेच्या पाठींब्यामुळे त्यांच्यावर होणारा अन्याय दुर करता येतो. मालक, उद्योजक , सरकार यांच्यावर संघटना दबाव टाकून आपल्या मागण्या मान्य करून घेऊ शकते. याउलट असंघटीत क्षेत्रातील कामगार हे कोणत्याही संघटनेचे सभासद नसतात याचे कारण म्हणजे त्यांच्या कामाचे स्वरूप, व्यसायातील कामगारांची संख्या, आर्थिक कुवत, हंगामी काम विखूरलेले स्वरूप इत्यादि अनेक बाबींमुळे त्यांच्या संघटना निर्मान होण्यात अनेक अडचणी येतात व त्यामुळे ते आपली संघटना स्थापन करूशकत नाहीत. कामगार असंघटीत असल्याचा फायदा मालक, उद्योजक, ठेकेदार घेतात व ते कामगारांची पिळवणूक करतात उदा. अल्प मजुरीत जादा काम करून घेणे, किमान वेतनापेक्षा कमी वेतन देणे, कामाचे अधिक तास, कधीही कमावरून कमी करने, कल्याणकारी सुविधा न देणे, हंगामी नियुक्ती करणे, कामगार कायद्याप्रमाणे कामगाराला सुरक्षिततेच्या सुविधा न पुरविने अशा अनेक समस्या असंघटीत क्षेत्रातील कामगारांच्या आहेत. देशातील एकूण लोकसंख्येंत या कामगारांची संख्या ४३.३ कोटी आहे, म्हणजे ४० % लोकसंख्या अशा अवस्थेत आपले जीवन जगत आहेत. एवढया मोठया प्रमाणात असलेल्या असंघटीत क्षेत्रातील कामगारांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीत सुधारणा करण्याचे मोठे आव्हान सरकारपुढे आहे. यासठी सरकारने आता अनेक कायदे व कल्याणकारी योजना सुरूकेल्या आहेत.

उद्दीष्टे. (Objectives)

१) असंघटीत कामगार सामाजिक सुरक्षिता अधिनियम, २००८ या असंघटित कामगारांसाठी केलेल्या नविन अधिनियमाचा अभ्यास करणे.
२) असंघटित कामगारांची सामाजिक व आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी विविध सरकारी योजना व कार्यक्रम यांची माहिती मिळविणे.
३) असंघटित कामगारांसाठी असलेल्या कल्याणकारी योजनांची माहिती मिळविणे.

असंघटित कामगार संकल्पना :

असंघटीत कामगाराला असंघटीत कामगार सामाजिक सुरक्षिता अधिनियम, २००८ च्या अंतर्गत एक घरगुती कामगार , स्वतंत्र नियोजित कामगार किंवा संघटीत क्षेत्रात मजुर म्हणून काम करणारे कामगार यांना या संकल्पनेत समाविष्ट करण्यात आले आहे, तसेच यामध्ये संघटीत क्षेत्रातील असे कामगार समाविष्ट करण्यात आले आहेत की जे या अधिनियमाच्या अनुसूचींीी मध्ये उल्लेख केलेले परंतू अधिनियम १) कामगार नुकसानभरपाई कायदा, १९२३ २) औद्योगिक विवाद कायदा, १९४७ (१९४७ चा १४) ३) राज्य कर्मचारी विमा कायदा, १९४८ (१९४८ चा ३४) ४) कर्मचारी भविष्यनिवाह निधी कायदा, १९५२ (१९५२ चा १९) ५) बाळंतपणासंबंधीच्या लाभाचा कायदा, १९६१(१९६१ चा ५३) आणि ६) उपदान प्रदान (ग्राच्युईटीचा) कायदा १९७२ (१९७२ चा ३९) यामध्ये येत नाहीत असे कामगार.

असंघटित कामगार क्षेत्र :

२००४२००५ या वर्षी राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संघटनेकडून केलेल्या सर्वेक्षणानुसार संघटीत आणि असंघटीत या दोन्ही क्षेत्रा मिळून देशात एकूण ४५.९ कोटी लोक कार्यरत होते. यापैकी जवळपास २.६ कोटी लोक हे संघटीत क्षेत्रात तर ४३.३ कोटी लोक असंघटीत क्षेत्रात कार्यरत होते. असंघटीत क्षेत्राताातील ४३.३ कोटी कामगारांपैकी २६.९ कोटी कामगार कृषी क्षेत्रात व २.६ कोटी बांधकाम क्षेत्रात आणि बाकीचे उत्पादना संबंधीत व्यवसाय,व्यापार, वाहतूक, दळणवळण व सेवा क्षेत्रात कार्यरत आहेत. असंघटीत कामगार घरगुती व्यवसायात मोठया संख्येने कार्यरत आहेत आणि विडया तयार करणे, अगरबत्ती तयार करणे, पापड तयार करणे, कपडे शिवणे तसेच कलाकुसरी करणे इत्यादि व्यवसायात आहेत.

असंघटीत क्षेत्रातील बहुसंख्य कामगारांचे काम हंगामी स्वरूपाचे असल्यामुळे मालक व नोकर यांच्यात औपचारीक संबंध नसतात तसेच त्यांना सामाजिक सुरक्षितता मिळत नाही. परंतु बरेचसे कायदे जसे कामगारांच्या नुकसान भरपाईचा कायदा १९२३, किमान वेतन कायदा १९४८, मातृत्व लाभ कायदा १९६१, कंत्राटी कामगारांविषयीचा कायदा १९७०, गृह निर्मान आणि इतर बांधकाम क्षेत्रातील कामगार कायदा १९९६, गृह निर्माण आणि इतर बांधकाम क्षेत्रातील कामगार कल्याण कायदा १९९६, इत्यादि प्रत्यक्ष तसे अप्रत्यक्ष स्वरूपात असंघटीत क्षेत्रातील कामगारांनाही लागू आहेत.

कामगार मंत्रालयाकडून असंघटीत क्षेत्रातील कामगार, तसेच विडी कामगार , चित्रपट क्षेत्रातील कामगार तसेच कोळश्याच्या खाणी व्यतीरिक्त ईतर

**Please cite this Article as :Vasant Gangadhar Bhandurge` ,** भारतातील असंघटित कामगारांच्या सामाजिक व आर्थिक सुरक्षेसाठी शासकीय पातळीवरील प्रयत्न : **Indian Streams Research Journal (Oct. ; 2012)**

खाण कामगारांसाठी कल्याण निधीची तरतूद केली जाते. या निधीचा वापर कामगारांच्या विविध कल्याणकारी योजना उदा. आरोग्य, निवास, मुलांसाठी शैक्षणिक सहाय्यता, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा इत्यादिंसाठी केला जातो.

सरकारने सामुहिक विमा योजना सुरू केलेली आहे, जसे की दारिद्रय रेषेखालील लोकांसाठी तसेच दारिद्रय रेषेच्या थोडे वर असणाऱ्यांसाठी जनश्री विमा योजना आणि भूमिहिन ग्रामिण कुटुंबांसाठी आम आदमी विमा योजना, की ज्यामध्ये असंघटीत क्षेत्रातील कामगार आहेत. काही रोजगाराच्या योजना आहेत, जसे स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार गॅरंटी योजना इत्यादि, ज्यामुळे असंघटीत क्षेत्रातील कामगारांना लाभ होत आहे.

असंघटीत क्षेत्रातील कामगारांसाठी कायदे :

सरकारने केंद्रीय कामगार संघटना, गैर सरकारी संघटना आणि इतर स्टेकहोल्डर यांच्या बरोबर चर्चा करून असंघटीत क्षेत्रातील कामगारांसाठी केंद्रीय कायद्याच्या उद्देशाने राष्ट्रीय असंघटीत क्षेत्र व्यवसाय आयोगाच्या ( NCEUS) शिफारशींवर विचार केला होता. त्यानंतर असंघटीत कामगार सामाजिक सुरक्षा विधेयक २००७ दि. १०.०९.२००७ ला राज्यसभेत सादर करण्यात आले. तसेच त्याला संसदेच्या स्थायी समितीकडे पाठविण्यात आले होते. स्थायी समितीच्या शिफारशी आणि स्टेकहोल्डर च्या सुचनांवर हे विधेयक तयार करून सरकारने राज्यसभेत सादर केले होते. विधेयकाला दुरूस्त्यांसह राज्यसभेने दि. २३.०२.२००८ आणि लोकसभे कडून १७.१२.२००८ ला पास केले होते. असंघटीत कामगार सामाजिक सुरक्षिता अधिनियम, २००८, ला ३१.१२.२००८ ला अधिनियमित केले व भरतीय राजपत्रात अधिसूचित केले. हा अधिनियम १६ मे २००९ पासून लागू करण्यात आला आहे.

अधिनियमाची वैशिष्टे

अधिनियमाची प्रमुख वैशिष्टे पुढील प्रमाणे आहेत

कलम २ नुसार असंघटीत कामगार, स्वतंत्र नियोजित व मजुरी करणारे कामगार यांच्याशी संबंधीत आहेत.
कलम ३ (१) मध्ये केंद्र सरकार कडून (क) जीवन आणि अकार्यक्षमतेसाठी (ख) आरोग्य व प्रसूती लाभ (ग) वृध्दावस्थेत संरक्षण (घ) केंद्र सरकार कडून निर्धारीत केलेल्या कोणत्याही इतर लाभांसंबंधीत असंघटीत कामगारांच्या भिन्न गटानुसार तयार करण्यात आलेल्या योजनांची तरतुद यामध्ये आहे.
कलम ३ (४) मध्ये राज्य सरकार कडून भविष्य निर्वाह निधी, कामगार अपघाताचा लाभ, निवास, मुलांसाठी शिक्षणाच्या योजना, कौशल्यात वाढ आणि वृध्दाश्रमा सबंधीत योजनांची तरतुद यामध्ये आहे.
कलम ४ हे केंद्र सरकारद्वारा तयार करण्यात आलेल्या योजनांसाठी वित्तपुरवठया संबंधीत आहे.
कलम ५ मध्ये केंद्रीय कामगार व रोजगार मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली सदस्य सचिव तसेच संसद सदस्य, असंघटीत कामगार, असंघटीत कामगारांचे नियोक्ता (मालक), सिविल सोसायटी, केंद्रीय मंत्रालयाचे आणि राज्यसरकारांचे प्रतिनिधित्व करणारे ३४ नामनिर्देशित सदस्य असणारे राष्ट्रीय सामाजिक सुरक्षा मंडळ स्थापन करण्याचा विचार केला आहे.
अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती संबंधीत व्यक्ती, अल्पसंख्यांक आणि महिलांसाठी पुरेसे प्रतिनिधित्व यांची तरतुद यामध्ये आहे.
राष्ट्रीय बोर्ड केंद्र सरकारला असंघटीत कामगारांच्या भिन्न वर्गांसाठी उपयुक्त योजनांची शिफारीस करेल तसेच या योजनांच्या कार्यान्वयाचे निरीक्षण करेल आणि या अधिनियमाच्या प्रशासनात निर्माण होणाऱ्या अडचणींविषयी केंद्र सरकारला सल्ला देईल.
कलम ६ मध्ये राज्य स्तरावर याच प्रकारच्या बोर्डाची निर्मिती करण्याची तरतुद आहे.
कलम ७ हे राज्य सरकारनी तयार केलेल्या योजनांच्या वित्त पुरवठया संबंधी आहे.
कलम ८ मध्ये जिल्हा प्रशासनाला यासंबंधी रेकार्ड ठेवण्याची तरतुद केली आहे.यासठी राज्य सरकार (क)ग्रामिण भागात जिल्हा पंचायतीला आणि (ख) शहरी भागात शहरी स्थायी समितीला असे कार्य करण्याचे आदेश देऊ शकते.
कलम ९ मध्ये असंघटीत कामगारांसाठी (क) उपलब्ध सामाजिक सुरक्षा योजनांच्या संबंधीत सुचनांचा प्रसार करणे (ख) जिल्हा प्रशासनाद्वारे कामगारांची नोंदनी करण्यासाठी सुविधा केंद्र स्थापन करण्याची तरतुद आहे.
कलम १० मध्ये अधिनियमाच्या अंतर्गत नोंदनीची पात्रता व अटी यांची तरतुद आहे.

अधिनियमाच्या अंतर्गत असंघटीत कामगार सामाजिक सुरक्षा नियम, २००९ तयार करून त्याची अधिसूचना जारी करण्यात आली आहे. तसेच राष्ट्रीय सामाजिक सुरक्षा बोर्डाची स्थापना करण्यात आली आहे. राष्ट्रीय बोर्ड असंघटीत कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा योजना जीवन आणि अपंगत्व, आरोग्य, प्रसूती लाभ, वृध्दावस्थेत संरक्षण आणि सरकारकडून देण्यात येणारे इतर लाभांसाठी शिफारीस करेल. राष्ट्रीय बोर्डाच्या दोन बैठका झाल्या आहेत आणि यामध्ये असंघटीत कामगारांच्या विशिष्ट वर्गासाठी राष्ट्रीय आरोग्य विमा योजना, जनश्री विमा योजना आणि वृध्दावस्था पेंशनचा विस्तार करण्याची शिफारस केलेली आहे.

वरील योजनांशिवाय असंघटीत क्षेत्रातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांसाठी (पाच व्यक्तींचे युनिट) 'राष्ट्रीय आरोग्य विमा योजना' नावाची योजना औपचारीक स्वरूपात ०१.१०.२७ ला सुरूकेली होती. ही योजना ०१.०४.२००८ पासून कार्यान्वीत झाली आहे, तसेच लाभार्थ्यांना लाभ मिळणे सुरूझाले आहे. या योजनेच्या अंतर्गत खालील लाभ येतात.

१) दारिद्ररेषेखाली येणाऱ्या पाच व्यक्तींच्या कुटूंबाला स्मार्ट कार्डवर आधारीत नगदी नसलेले ३०,००० रूचे विमा संरक्षण.
२) पुर्वी असलेले सर्व रोग यामध्ये येतात.
३) रूग्णालयात दाखल असतांना होणारा खर्च, प्रसूती लाभांसहीत अनेक आजार यामध्ये सामील करण्यात आले आहेत.
४) प्रती व्हीजीट १०० रूपये जाण्या येण्याच्या खर्चासहित याची मर्यादा १,००० रूपये पर्यंत प्रती वर्ष.

३१.०१.२०११ पर्यंत २७ राज्य/केंद्रशासीत प्रदेश यांना ही प्रक्रीया लागू करण्याची सुरूवात करण्यात आली आहे. या २७ राज्य/केंद्रशासीत प्रदेशातील २५ राज्य त्यांची नावे अशी, अरूणाचल प्रदेश, आसाम, बिहार, चंदीगड, छत्तीसगड, दिल्ली, गोवा, गुजरात, हरियाणा, हिमाचल प्रदेश, झारखंड, कर्नाटक, केरळ, महाराष्ट्र, मणिपूर, मेघालय, नागालँड, ओरीसा, पंजाब, तामिळनाडू, त्रिपुरा, उत्तत प्रदेश, उत्तराखंड, पश्चिम बंगाल आणि चंदीगड प्रशासनाने स्मार्ट कार्ड देणे सुरूकेले आहे. दिनांक ३१.०१.२०११ पर्यंत २.२६ कोटींपेक्षा अधिक स्मार्ट कार्ड दिल्या गेले आहेत. आंध्र प्रदेश व राजस्थान या राज्यांची स्वतःची आरोग्य विमा योजना आहे यांना सोडून अन्य राज्यात या योजनेची कार्यवाही करण्याची प्रक्रीया सुरूझाली आहे.

१८ ते ५९ वर्षांच्या मधिल वय असणारे ग्रामिण भूमिहीन कुटुंबाला मृत्यु आणि अपंगत्वासाठी संरक्षण देण्यासाठी २ आक्टोबर, २००७ ला 'आम आदमी विमा योजना' ही सुरूकरण्यात आली आहे. या योजनेच्या अंतर्गत परिवारातील प्रमुख व्यक्तीच्या किंवा कमावत्या एका व्यक्तीचा विमा केल्या जाईल, केंद्र सरकार २०० रू. प्रतिवर्षी प्रती व्यक्तीच्या प्रिमियमच्या ५०% भार उचलेल आणि ५० % भार राज्य सरकार उचलेल. या योजनेच्या लाभांमध्ये नैसर्गिक मृत्यु आल्यास ३०,००० रूपये, दुर्घटनेमुळे मृत्यु किंवा कायम स्वरूपी अपंगत्व (दुर्घटनेत दोन्ही डोळे किंवा दोन्ही पाय, दोन्ही हात इत्यादि अवयव कायम स्वरूपी निकामी झाल्यास ) आल्यास ७५,००० रूपये लाभ मिळेल. आंशिक पूर्ण अपंगत्व (दुर्घटनेत एक डोळा किंवा कोणताही एक अवयव कायम स्वरूपी निकामी झाल्यास ) ३७,५०० रूपये विमा संरक्षण मिळते. या योजनेत लाभार्थ्यांच्या ९ वी ते १२ वी वर्गात शिकणाऱ्या जास्तीत जास्त दोन मुलांसाठी ३०० रू प्रती तिमाही प्रत्येक मुलाला शिष्यवृत्ती देण्याचा विचार करण्यात आला आहे. ही योजना १.५ कोटी ग्रामीण भूमिहीन कुटुंबांसाठी तयार करण्यात आली आहे. लाभार्थ्यांच्या मुलांना शिष्यवृत्ती देण्याच्या उद्देशाने ५०० कोटी रूपयाचा स्वतंत्र निधी यासाठी उभा केला जात आहे.

या प्रकारे राष्ट्रीय वृध्दावस्था पेंशन योजनेचा (इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दावस्था पेंशन योजना) ०१.११.२००७ पासून दारिद्रय रेषेखाली असलेल्या ६५ वर्षापेक्षा अधिक वय असणाऱ्या सर्व नागरिकांना यात समावेश करण्यासाठी विस्तार करण्यात आला आहे.

गृह निर्माण व इतर बांधकाम कामगार :

संघटीत क्षेत्रातील बहुसंख्य कामगारवर्ग हा बांधकाम क्षेत्रातील कामगारांचा आहे. २००४२००५ मध्ये ण्श्ै द्वारा केलेल्या सर्वेक्षणानुसार, जवळपास २.५७ कोटी कामगार बांधकाम क्षेत्रात कार्यरत होते. सरकारने बांधकाम कामगारांसाठी खालील दोन कायदे केले आहेत.

- गृह निर्मान व ईतर बांधकाम कामगार (रोगगार तसेच सेवा शर्ती कायदा) अधिनियम, १९९६
- गृह निर्मान व ईतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम, १९९६

या बरोबर गृह निर्मान व ईतर बांधकाम कामगार (रोगगार तसेच सेवा शर्ती कायदा) केंद्रीय नियमावली, १९९८ दिनांक १९.११.१९९८ ला अधिसूचित केली आहे.

हा नियम त्या सर्व आस्थापनांना लागू होतो , की ज्यामध्ये गृह निर्मान व ईतर बांधकामात १० किंवा १० पेक्षा अधिक कामगार काम करतात किंवा ज्या योजनेचा खर्च १० लाख रूपयांपेक्षा अधिक आहे. या कायद्याला लागू केल्यामुळे निर्मान होणाऱ्या घटनांविषयी संबंधीत सरकारला सल्ला देण्यासाठी केंद्रीय व राज्य सल्ला समितीची निर्मिती, राज्य सरकार कडून कल्याण मंडळाची स्थापना तसेच या निधी अंतर्गत लाभ मिळणाऱ्यांची नोंदनी व त्यांचे ओळखपत्र इत्यादिंची तरतूद करण्यात आली आहे. या नियमात राज्य स्तरावर कल्याण निधीची स्थापना करून बांधकाम कामगारांसाठी रोजगार व सेवा शर्ती , सुरक्षा, आरोग्य तसेच कल्याणकारी उपाय करण्याची तरतूद आहे. ज्याचा वित्तपुरवठयाचा खर्च हा लाभ घेणाऱ्या कडून अंशदान, नियोक्त्याकडून खर्च केल्या गेलेला बांधकाम खर्चाच्या १ ते २ टक्के पर्यंत सर्व बांधकामावर उपकर बसवून केला जाईल (सरकारने उपकराचा दर १% अधिसूचीत केला आहे) या निधीचा उपयोग दुर्घटनेच्या बाबतीत त्या कुटुंबाला आर्थिक सहाय्य करण्या करीता, वृध्दावस्था पेंशन, घरासाठी कर्ज, विमा हप्ता भरण्याकरीता, मुलांचे शिक्षण, उपचार व प्रसूती लाभ इत्यादिंसाठी केला जाईल.

बऱ्याच राज्य सरकारांनी व केंद्रशासीत प्रदेशांनी राज्य कल्याण मंडळाची स्थापना केली आहे. तामिळनाडू सरकार आपला स्वतःचा अधिनियम लागू करीत आहे. भारत सरकारने उपकराची रक्कम १% अधिसूचीत केली होती, बऱ्याचशा राज्य सरकारांनीसुध्दा हीच दर अधिसूचीत केली आहे. आता पर्यंत, राज्य सरकारे , केंद्रशासीत प्रदेश यांचे कडून ३०.०९.२०१० पर्यंत ३२५१.०१ कोटी रूपयाची रक्कम उपकराद्वारे जमा झाली आहे आणि ७३०.९६ कोटी रूपयाची रक्कम त्यांच्याद्वारे तयार केलेल्या कल्याणाच्या योजनांवर खर्च केली आहे.

विशेष गटाची स्थापना :

पंतप्रधानांच्या कार्यालयाकडून दिल्या गेलेल्या सुचनेनुसार इतर बाबींबरोबर गृह निर्मान व ईतर बांधकाम कामगार (रोगगार तसेच सेवा शर्ती कायदा) अधिनियम, १९९६ चे परीक्षण व तपासणी करण्यासाठी सचिव, कामगार व रोजगार मंत्रालय यांच्या अध्यक्षतेखाली सप्टेंबर २००४ मध्ये एका विशेष गटाची स्थापना केली आहे, ज्यामध्ये डघ्फ्अश्ळी (डरिएच्त्र घ्एन्एराल फाच्त्रेर अदवच्िए श्एरवच्िए ान्द ळाबुर ीन्स्तुित्ए ), रेल्वे मंत्रालय आणि नगर विकास मंत्रालय इत्यादिंचे प्रतिनिधी सामील झालेले आहेत. आतापर्यंत या गटाने वेगवेगळया राज्यात राज्य सरकारे / केंद्रशासीत प्रदेश यांच्या प्रतिनिधी बरोबर तेरा विभागीय बैढका घेतल्या आहेत.

स्थलांतरीत कामगार आणि आंतरराज्य स्थलांतरीत कामगार :

२००१ च्या जनगणनेगुसार देशात ३१४.५४ मिलीयन व्यक्तींनी आपले राहण्याचे ठिकाण बदललेले आहे तसेच यामधिल २९.९० मिलीयन किंवा ९ % व्यक्तींनी कामाकरीता आपले राज्य सोडलले आहे. आंतरराज्य स्थलांतरीत कामगार (रोजगाराचा सेव शर्ती कायदा) अधिनियम, १९७९ स्थलांतरीत कामगारांचे अधिकारांची सुरक्षितता आणि त्यांच्या हीताच्या संरक्षणासाठी करण्यात आला होता.

या अधिनियमाचा उद्देश आंतरराज्य स्थलांतरीत कामगारांच्या नियोजनाचे नियमन करणे आणि त्यांना सेवा शर्तींची तरतुद करणे हा आहे. हा अधिनियम त्या प्रत्येक आस्थापनेला (आणि ठेकेदाराला) लागू होतो की ज्या आस्थापनेत किंवा ठेकेदाराकडे पाच किंवा त्यापेक्षा अधिक आंतरराज्य स्थलांतरीत कामगार काम करीत आहेत. या अधिनियमात कामगारांसाठी पासबुक देण्याची तरतुद आहे, ज्यामध्ये स्थलांतरीत भत्ता देण्याची, मासिक वेतनाच्या ५० टक्के किंवा ७५ रूपये यापैकी जे जास्त असेल ते , प्रवास भत्ता देणे ज्यामध्ये प्रवासाचा कालावधीतील वेतनही सामील आहे, राहण्यासाठी योग्य ठिकाणाची व्यवस्था, वैद्याकीय सुविधा, वेतनाची सुविधा, लिंगभेद न करता समान कामासाठी समान वेतन इत्यादि बाबींविषयी संपूर्ण माहिती दिलेली असेल.

केंद्र आणि राज्य यांच्या अंतर्गत येणाऱ्या आस्थापनात अधिनियमाच्या तरतुदींच्या कार्यवाहीची मुख्य जबाबदारी केंद्र व राज्य / केंद्र शासीत सरकारे यांची आहे.

स्थलांतराच्या समस्येचा विविध बाजूंनी विचार करायला पाहिजे , जसे ग्रामीण विकासाद्वारे प्रगत पायाभूत सुविधांच्या तरतूदी करून प्रादेशीक विषमता दुर करण्यासाठी साधन सामुग्रीचे समान वाटप, रोजगार निर्मिती, जमिन सुधारणा, साक्षरता वाढविने, आर्थिक सहायता या पासून स्थलांतर थांबविले पाहिजे. राज्य स्तरावर मोठया प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्याच्या हेतूने सरकारने विविध योजना व कार्यक्रम तयार केलेले आहेत ते कार्यक्रम पुढील प्रमाणे आहेत, स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना (श्घ्श्), पंतप्रधान ग्राम सडक योजना (ऋंघ्श्), संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना (श्घ्श्), राष्ट्रीय कामाच्या बदल्यात धान्य योजना (ण्फ्फ्द्वऋ), इंदिरा आवास योजना (ीअष), एकत्रीत पडीत जमीन विकास कार्यक्रम (ीद्वडऋ), दुस्काळग्रस्त क्षेत्र विकास कार्यक्रम (डऋअऋ), वाळवंट विकास कार्यक्रम (डडऋ) इत्यादि सुरू केले आहेत. या व्यतीरिक्त, सरकारने ग्रामीण भागातील लोकांना १०० दिवसांची रोजगाराची गॅरंटी मिळेल या हेतूने राष्ट्रीय ग्रामीण रोजगार गॅरंटी अधिनियम करून या अधिनियमाच्या अंमलबजवनीची सुरूवात केलेली आहे.

निष्कर्ष :

- भारतात असंघटित कामगारांचे प्रमाण ९४.४% आहे, तर संघटित कामगारांचे प्रमाण फारच कमी म्हणजे फक्त ५.६% एवढे आहे.
- असंघटित क्षेत्रातील कामगारांना सामाजिक सुरक्षा लाभावी या दृष्टीकोनातून सरकारने व्यापक कायदे तयार केलेले आहेत.
- सरकारने असंघटित कामगारांसाठी अनेक योजना व कार्यक्रम तयार केलेले आहेत. काही राज्यांमध्ये त्याची कार्यवाही सुरूझालेली आहे.
- बांधकाम क्षेत्रातील कामगार, स्थलंतरीत कामगार, भूमिहीन शेतमजूर इत्यादि वर्गांसाठी कायद्याने संरक्षण करण्यात आले तसेच त्यांच्यासाठी कल्याणकारी योजना व रोजगारांच्या संधी उपलब्ध केल्या आहेत.
- केलेले कायदे किती प्रमाणात असंघटित कामगारांना संरक्षण देऊ शकतील हे कळण्यासाठी आपल्याला काही काळ प्रतीक्षा करावी लागेल.
- असंघटित कामगारांना जर या कायद्याने संरक्षण मिळाले व रोजगारांच्या योजनांचा पुरेपुर लाभ मिळाला तर त्यांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीत निश्चितच सुधारणा होईल यात शंका नही.

भारतातील संघटित व असंघटित कामगार




संदर्भ ग्रंथ :

१) Annual Report 2010- 2011, Ministry of Labour and Employment, Government of India, Website : http://www.labour.nic.in
२) Indian Economy, Datta R. & Sundaram K.P.M., 2010, S. Chand & Company New Delhi
३) कामगार कल्याण, १९९२, गोखले शरदचंद्र, विद्या प्रकाशन, पुणे
४) संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे, २०००, डॉ. आगलावे प्रदीप, विद्या प्रकाशन नागपूर

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net